
श्री छत्रपती .....

# शिवाजी महाराज यांचा पोवाडा



लेखक

शाहीर पुंडलीक फरांदे सातारा.

९९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. ९८०५
REFBK-0010572
REFBK-0010572

मराठी ग्रंथ संग्रहालय
सत्यमेव जयते २३३२३ दि:
क्र. ...... नों: दि:
९४०६

श्री छत्रपति

# शिवाजी महाराज

यांचा

# पोवाडा

REFBK-0010572
REFBK-0010572
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९०४६२
संदर्भ शाखा (स्थळ)

(शिव जयंति-उत्सव २२ एप्रिल १९५८)

शाहीर : पुंडलीक भीपतराव फरांदे सातारा.

( किंमत २५ नये पैसे )

## सादर समर्पण

बहुजन समाजाच्या उद्धारासाठीं तन, मन, धन अर्पून
अविरत व आमरण परिश्रम घेवून ज्यांनीं
आपला देह चंदनासारखा झिजविला
अशा
परम पूज्य गुरुवर्य :— केशवरावजी विचारे
यांचे पुण्यस्मृतीस सादर समर्पण.

---

पुस्तके मिळण्याचे ठिकाण :
एम. विनायक ब्रदर्स
जेन्टस् टेलर
१९७ डॉक्टर व्हिगा स्ट्रीट, गायवाडी (चिराबाजार)
मुंबई नं. २

# प्रस्तावना

माझे मित्र आणि सहकारी लोकशाहीर पुंडलिक श्रीपतराव फरांदे यांनीं भारताचे स्फूर्ति दैवत प. पू. श्री छत्रपति शिवाजी महाराज यांच्या अनेक अंगानें व्यापलेल्या नाट्यपूर्ण चारित्र्यावर वास्तववादी पोवाडा लिहून मराठी वाङ्मयांत मोलाची भर टाकली आहे.

नागपूरपासून बेळगांवपर्यंतच्या मराठी प्रदेशांतील दऱ्याखोऱ्यांत, कोनाकोपऱ्यांत व पठांरावरील माळरानांत आपल्या पहाडी आवाजानें जागृतीचा व लोकशिक्षणाचा कार्यक्रम गाजवून व गर्जून शाहीर पुंडलिकराव फरांदे सुपरिचीत झाले आहेत.

शाहीर फरांदे यांनीं १९४८ सालीं परम पूज्य गुरुवर्य विचारे प्रणीत जनता शिक्षण कार्याला वाहून घेतले, शिबीरें चालवून ग्रामीण कार्यकर्ते तयार केले. पोवाडे व लोकगीतें गावून बहुजनांची झोपलेली मनें जागी केली. संघटक म्हणून कांहीं शाखा चालविल्या, आजीव सेवक म्हणून अद्यापही ते अव्याहत कार्य करीत आहेत.

नभोवाणीच्या मुंबई केंद्रावरून फरांदे यांच्या श्रुतिकांचे व लोकगीतांचें कार्यक्रम सुज्ञ श्रोत्यांना आनंद देत आले. त्यांच्या गाण्यांच्या उतरलेल्या रेकॉर्ड तर खेडोपाडीं गायल्या जात आहेत. व्याख्याते, शाहीर, संघटक, गायक, लेखक, नट इत्यादि विविध भूमिकेंतून शाहीर फरांदे यांनीं मराठी मायभूमिची मोठ्या भक्तिभावानें पूजा केली आहे व करीत आहेत.

शिवरायांच्या किर्तीचा ' सूर्य ' काळ लोटेल तसा अधिक तेजस्वी होऊन त्याचें प्रकाशमय क्षितीज वाढत राहील. शिवाजी महाराज म्हणजेच " महाराष्ट्र व मराठे " आणि शिवराया म्हणजेच ' स्फूर्ती व स्वातंत्र्याची प्रेरणा होय.' शिवचारित्र्याशिवाय महाराष्ट्र नाम-मात्र ठरतो. अनेक वेळां राजकीय व सामाजिक क्रांतीची वादळें होऊन गेलीं. परंतु शिवराया-बद्दलची तीच भावना व तीच श्रद्धा बहुजनांना चेतना देत आली, नवा संदेश देत आली, तीनशें वर्षे गेलीं तरी त्यांच्या रसरसलेल्या पराक्रमी जीवनाचा मूर्तीमंत चित्रपट डोळयांपुढें उभा रहातो.

शाहीर फरांदे यांनीं अनेक चरित्र ग्रंथ वाचून, संशोधन करून विशेषतः गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनीं १९०५ सालीं लिहिलेल्या शिवरायांच्या चारित्र्यावरील अमर काव्याचा अभ्यास करून शिवचारित्र्यांतील अनेक खोल व विविध कप्पे, काव्याचा सुंदर शृंगार चढवून लोकापुढें दाखविले आहेत. लोकोत्तर पुरुषांच्या मानवी चारित्र्यावर देवाच्या अवताराचा शिक्कामोर्तब करून भारतीय संस्कृतींत दैववादी दृष्टी पसरविण्याचें कार्य कित्येक कवी शाहीरांनीं केले आहे. त्यामुळें बहुजन समाजाची मानसिक गुलामगिरी अधिक दृढमूल झाली. हा मोठा दोष शाहीर फरांदे यांनीं पूर्णतः टाळून इतिहास शास्त्रांतील वस्तुनिष्ट तत्वाच्या निकषावर आपले काव्य उतरविलें आहे.

मराठ्यांच्या पराक्रमाला स्वातंत्र्याची धार आणून स्वातंत्र्याची उदात्त कल्पना मूर्त स्वरुपांत आणणें ही साधी गोष्ट नव्हती. विजापूरकर, मोंगल त्यांच्या पदरीं असलेले पराक्रमी मराठे सरदार यांचेशी सामना देऊन नवे स्वातंत्र्य तळपत ठेवणें ही शिवचरित्रातील महान व स्फूर्तीदायक घटना आहे. अफझुलखानाच्या संशयीत धोरणासंबंधीं निर्णय व अम्मलबजावणी याची नुसती कल्पना केली तरी त्यांच्या धाडसाची व मुत्सद्देगिरीची साक्ष पटेल. मराठे सरदार व मिर्झा जयसिंग यांचेशीं केलेली खलबतें हा त्यांच्या व्यापक ध्येयवादाचा पुरावा आहे. आग्र्याहुन केलेलें पलायन ही त्यांच्या योजकतेची, धाडसाची व कल्पकतेची परमावधी आहे. स्वजनांना ताळ्यावर आणण्याकरितां केलेल्या युक्त्या यांच्या चातुर्याची साक्ष पटवितात. केवळ मुलुख जिंकणें सोंपें परंतु तेथें राज्यव्यवस्था स्थापणें ही राज्यकर्त्यांची कसोटी असतें. अष्टप्रधान नेमून आदर्श लोकराज्य निर्माण केलें. नेतृत्वांतील महत्वाचे गुण, कठोर शिस्त व उच्च नीतिमत्ता महाराजांच्या ठायीं जाज्वल्य स्वरुपांत वसत होती. इतिहासांत इतके वैशिष्ठ्यपूर्ण प्रसंग क्वचित घडतात. अशा हिमालयासारख्या अति उंच, पवित्र आणि विशाल व्यक्तिमत्वाचें दिव्य दर्शन शाहीर फगंदे यांनीं करून मराठी जनतेला आजच्या परिस्थितींत नवा संदेश दिला आहे.

वास्तववादी काव्य पुष्पांच्या सुगंधानें आणि वाणींतील ज्ञान अमृताच्या वर्षावानें बहूजन समाज अज्ञानाच्या निद्रेंतून जागा होईल असें सामर्थ्य मित्रवर्य फगंदे यांचे अंगीं अधिकाअधीक यवो आणि अंगीकृत कार्यांत ते यशस्वी होवोत अशी इच्छा प्रगट करतो. जनतेनें शाहीराचे कोडकौतुक, आशीर्वाद, आदर व अर्थसहाय्य करून लोककलेला प्रोत्साहन द्यावे अशी विनंती करून . या काव्य-पुष्पाला सुयश चिंतितों,

जे, बी. लाहीगुडे,
नांदवळ ( जि. उ. सातारा )

# पोवाडा

दा. क्र. १०५८२
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

धन्य धन्य शिवाजी महाराज । कीर्तिचा ताज । शोभला साज
चमकला साऱ्या हिंदुस्थानांत । झळकल्या दाही दिशाहि साथ ।
नटला महाराष्ट्र म्हणूनी त्यांत ॥ धृ ॥

बाळपणीं मिळाली स्फूर्ति । जिजाआई करती । बाळावर प्रीती ।
संस्कारानें मन भारलें खास । मिळवूं स्वातंत्र्य हिच पुढें आस ।
म्हणून जुलमाचे तोडले फास ॥१॥

गरगरा पट्टा फिरविला । भाला फेकला । घोडा दौडविला ।
मावळे हेटकरी तयार केलं । दऱ्या कपारींत फिरविलं ।
तोरणा जिंकून निशाण रोवलं ॥२॥

सोळाव्या वर्षी विजयाला । बोलबाला झाला । साऱ्या मुलखाला ।
आदिलशहाला राग आला । पिता शहाजी कैद केला।
तोबा तोबा असा गहजब झाला ॥ ३ ॥

( चाल :- जगताचा त्राता )

संकटाला न डगमगतां मोठ्या दक्षतेनें ।
शहाजींना सोडविले पुढें आत्म विश्वासाने ॥ १ ॥

मन मिळावूं स्वार्थत्यागी स्वभाव धडाडीचा ।
साधी रहाणी विचार त्यांचा उच्च ध्येयांचा ॥ २ ॥

बुद्धीमानही धोरणी करारी धर्म प्रवण होता ।
राजकारणी पुरा मुत्सद्दी अष्ट पैलु नेता ॥ ३ ॥

( चाल :– कार्याला सुरवात केली )

चंद्रराव मोरे जावळीचा । हीन वृत्तीचा
शत्रूस्वकियांचा । मित्र परक्यांचा
विरोधांतून काटा कायमचा निघाला त्याचा ॥१॥

(इ. स. १६५६)

जावळी प्रांत हस्तगत केला । जोर वाढला
मुलुख जिंकला । बराच घेतला
शत्रूला सळो कीं पळो असा मग केला ॥२॥

आदिलशहाला धास्ती पडली । मंडळी बोलवली
विजापूराला । दरबार भरविला
सरदार अफझुलखानानं तिथं विडा उचलला ॥३॥

दींन करीत खान निघाला । वाईला आला
तळ हो दिला । पसारा मांडला
प्रतापगडाच्याखालीं भेटीचा सोहळा जमला ॥४॥

चिरडून मारीन शिवाजीला । निश्चय केलेला
दरबारीं बोललेला । घमेंड चढलेला
बगलेत धरून शिवबांना दाबले समयाला ॥५॥

(इ. स. १६५९)

काखेंत धरले मानेला । संशय मनीं आला
वार ही झाला । फटका बसला
वाघ नख्या तेव्हां खुपसूनी इंगा जिरविला ॥६॥

(चाल :– सलग पट्टे वाटणीला)

घमेंडखोर अफझुलखान । त्याचा गेला मग प्राण
अशा धाडशीं कृत्यान । आदिलशाहीला धक्का बसला
अहो बसला । रुस्तुमज्या वांझा बार ठरला ॥१॥

पुढें शिद्दी जोहारास । त्यानें पन्हाळगडास
कोंडले राजे शिवाजीस । योजून चांगल्या युक्तिस
अहो युक्तिस । निसटले विशाळगडास ॥२॥

पटली साक्ष चातुर्याची । आणि धाडशी सामर्थ्यांची
दैना केली कित्येकांची । कुडाळकर सावंत यांची
अहो यांची । सिद्दी जंजिरेकर मंडळींची ॥३॥

कोकण भाग जिंकियला । त्याचे रक्षण करण्याला
सुवर्ण–विजय किल्ल्यांला । नव्यानें जन्म हो दिला
अहो दिला । उत्कृष्ट आरमार पहाऱ्याला ॥ ४ ॥

( चाल : आयुष्याची वर्षे चाळीस )

( इ. स. १६६२ )
शिवाजीच्या नाशासाठीं । केल्या मोठ्या खटपटी
अशक्य झाले त्यांना शेवटी । शहाजींच्या मध्यस्थीनें
तहकेला विचारानें । स्वराज्यास पात्र ठरले पर्यायानें ॥ १ ॥

( इ. स. १६६४ )
अशा स्वराज्याच्यावेळीं । औरंगजेब मनीं जळी
जाणार शाहस्तेखान पुण्यांत बळी । जनांमध्यें झालें हांसे
निभले बोटावर त्याचे । ऐकून शहेनशा क्रोधेंनाचे ॥ २ ॥

धनाढ्य अशा सुरतेची । होती तेव्हां मोंगलांची
लुटली राजरोस देशासाठीं । त्यामुळें चिडले खच्चून
आले सेनापति तापून । मिर्झा जयसिंग दिल्लेरखान ॥ ३ ॥

लढाई झाली जोरकस । बावीस किल्ले मोंगलास
तह झाला पुढें आपसांत । केला आग्रह जयसिंगानें
आगऱ्यास आपण येणें । अपमान केला तिथं बादशहानें ॥४॥

औरंगजेब आनंदीत । ठेवले त्यांना कैदेत
शिवाजी माझ्या म्हणें मुठींत । महाराजांनीं युक्ति काढून
घेतली आपली सुटका करून । आले संभाजीसह निघून ॥ ५ ॥

( इ. स. १६६८ )

महाराष्ट्रांत आल्यावर । घेतले किल्ले भराभर
मोंगलास केले पक्के जर्जर । बादशहानें कंटाळून
राजा असे समजून । मान्य केले हो तह करून ॥ ६ ॥

( चाल : पोवाड्याची जी जी जी )

( इ. स. १६७० )

सिंहगड आणि पुरंदर । घेतले पुढें लढून बरोबर
साल्हेर तसेंच मुल्हेर । लढ्यामध्यें केली जिगर
पराक्रमाची शर्त करून । मोंगलांची टाकली जिरवून
स्वतंत्र अशा राज्यास । कबूल करावे लागले मोंगलांस
स्वराज्याचं कंकण बांधून । केलं राज्य त्यांनीं स्थापन
( जून ६ रोजीं सर्वांना बसावा वचक । म्हणून केला राज्यभिषेक
इ. स. १६७४) अष्टप्रधानांची नेमणूक । लोकशाहीचा मूळ कल्पक
कर्नाटकावर स्वारी करून । मद्रासपर्यंत घेतला जिंकून

( चाल : पोवाड्याची धावती )

मोंगला विरुद्ध विजापूरकरांना केली मदत ।
(इ. स. १६८०) त्रासानें आजारी पडून रायगडीं अंत ॥ १ ॥

हादरली भूमि आणि वरी फाटलं आभाळ ।
हळहळली मनें देशांत झाला कल्लोळ ॥२॥

राष्ट्राचा केला उद्धार देह झिजवून ।
जबरदस्त झाली कामगिरी त्यांच्या हातून ॥ ३ ॥

परस्त्रिला दिली वागणूक मातेसमान ।
केले कार्य शक्ति आणि युक्ति एकवटून ॥ ४ ॥

गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांना 'शिवाजी महाराज' हे भारताचा महान् ठेवा वाटत होते त्यांनीं १९०५ साली 'शिवाजी उत्सव' या नांवाचे काव्य लिहीले. त्या अनुरोधानें )

भारताची स्फूर्तिदेवता–अशी योग्यता–परिक्षण होता
विश्वकवीनें केला अभिषेक–शिवप्रभू कसे दिसले ठळक
लेखी पटवीली सत्य ओळख–

मंत्रद्रष्टे अशा कवीनें-स्तोत्र लिहीले-प्रसिद्ध झाले
शिवाजी उत्सव या नांवानें पुढें ऑर्गनायझर साप्ताहिकानें
इंग्लिश रुपांतर केले चंदानें

एकतंत्री धर्मराज्यांत–सांधू हा देश–भारताला खास
मुळविचारानें केली सुरवात–सुचली नाहीं त्यांना दुसरी बात
दिल्ली बादशाही आणिली संपुष्टांत

असत्य अशा इतिहासाला–पायाखालीं घाला--तुडवा पुरा त्याला
सत्यमय खास तुमच्या तपाला–सदैव राहणाऱ्या अमर कीर्तिला
उजाळा देणारा खरा त्रिकाला

( चाल :— जी जी जी )

( श्री छत्रपती शिवाजी महाराजांना उद्देशूनच )

हे महर्षि दिव्य दृष्टि आपुली–भारत–भूमि ललामभूत झाली
लोकार्पित जीवन तुमचे–रणक्षेत्री नाचल साचे

राहिल भारताचा महान ठेवा–अशी उज्वल तपस्वी सेवा
राजसन्यासी जसे अज्ञात–तसे आपण प्रगट झालात

निर्झर येतो जसा अकस्मात-खडक फोडून पुढें वहात
तशी कृती जाहली खाशी-ही विभुती आहे तरी कशी ?
पडला प्रश्न जगाला असा—तेव्हां दिसला देखावा कसा

( चाल :- धावती जी जी जी)

गुरूदेव रविन्द्रनाथ वर्णीतात महत्त्व
नजरे वाटे पहात निसर्ग केले कवित्व

बंगालचा परिसर गाजे विजयानें खास
विस्मृतिच्या तीन शतकांचा छेद करण्यास

शिवबांचे शौर्यशालित्व नव्या तेजांत
अपूर्व सौंदर्यानें आज पुन्हा प्रगटत

(चाल :- दांगटी)

समरांत सत्य तळपले—तेच झळकूं आतां लागले
बंगाली प्रजाजन बोले—मनो मंदीरीं तुम्हां बसविले
तुमच्या शिकवणूकीमुळें—महाराष्ट्र बंगाल संयोग जुळे
मराठ्यासह शुद्ध भावनेनें—उत्साहानें जमा मेळाव्यानें
दक्षिण उत्तर भारतानें—पूर्व पश्चिम अशा दिशेनें
वाढेल आत्मबल चोंहिकडे—नाचेल भारत विश्वापुढें
असे आव्हान तुम्हीं दिले—पडसाद त्याचे आतां आवडीनें खरच उमटले

(मिळवणी)

गर्जा जय जयकार शिवबांचा—आधार आम्हां त्यांच्या-योग्य वर्तनाचा
खड्या प्रसंगातून मार्ग काढला—बिकट अवस्थेतून समाज तारला
माहितीसाठीं फरांदे बराच फिरला

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
23323 वि: पोवाडा
९७०६ नों: दि:

( चाल : नवखंडामध्यें देशआपुला)

शिवरायानें अंगीं विलक्षण जोम चढविला ।
भाषाशैली आणि कर्तृत्वानें मान वाढविला ॥१॥

भारत व्यापी होती चळवळ त्यांची निश्चित ।
मराठ्या पुरती नव्हती कल्पना योजना भारदस्त ॥२॥

वरील हेतूनें केले प्रयत्न इतर राज्यांत
इतिहासाचे करितां संशोधन आलें ध्यानांत ॥३॥

नियम जो त काढीत होते स्वतः पाळीत
मोडणाराला कडक शासन केले जारीत ॥४॥

मुसलमान हा आगा हैदरी खाजगी चिटणीस ।
प्रमुखापैकीं नेमला आरमारी दर्या खानास ॥५॥

जातीवादाला नव्हता थारा त्यांच्या राज्यांत !
अन्यायाच्या विरुद्ध लढले हाच खरा बेत ॥६॥

( चाल :- पोवाड्याची दांगटी )

सांगू किती तरी महितीला । असें वाटते माझ्या मनाला
एकदिलानें हातभार लाविला । सत्य तरलें पुढें चिकाटीला
यशाचे वाटे कोणाला । जिजा माता शहाजी श्रेयाला
दादोजी कोंडदेव समयाला । तानाजी शेलार मामाना
येसाजी बाजी प्रभुना । नेताजीप्रतापरावाना

नाईक बहिर्जी मुरारबाजींना । सूर्याजी जिवबा महाल्यांना
बाळाजी आवजी चिटणीसांना । मोरोपंत पिंगळे, हिरोजींना
प्रतापराव गुजर अशांना । हंबीरराव मोहिते शूरांना
बंधू भगिनी होत्या साथीला । लावला प्राण ज्यांनीं पणाला
संतांनीं अशा कार्याला । केलें सहाय्य कीं, स्वातंत्र्याला
युगप्रवर्तक असा मान राजे शिवबांना ॥ जी ॥

( मिळवणी )

सर्वांची केली कदर । राजे दिलदार । करून निर्धार ।
नूतन सृष्टिच केली निर्माण । आत्म तेजाच्या रत्नांची खाण
शाहीर फरांदे लिहीतो गुणगान

तारीख ३१-१२-५६ सातारा सिटी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नों: दि: ......................
REFBK-0010572
REFBK-0010572
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १०५६२
(स्थळ प्रत)

——— ••• ———

# मनोगत

माझं चौथं पुष्प आपणापुढें ठेवतांना मला अत्यानंद होत आहे. यापूर्वीचीं प्रकाशनें विक्रीच्या दृष्टीनें छापली नव्हती, ती कोणत्याहि परिस्थितींत लोकांच्यापुढें यावीत आणि म्हणूनच त्याच्या हजारों प्रती मी विनामूल्य वाटल्या.

हे प्रकाशन यावेळीं मला बाहेर काढतां आलं नसतं. परंतु माझ्या अनेक स्नेह्यांनीं आणि बंधु-भगिनीनीं "तुम्हीं याच शिवजयंतींत हें पुस्तक छापून घ्या." असा आग्रह केला. आर्थिक सहाय्य आम्हीं आमच्या शक्तिनुसार करतो. असें आश्वासन मिळाल्यानंतर मला प्रोत्साहन मिळाले व त्यानंतर पुढच्या जुळवाजुळवीला सुरवात केली. त्यांत "बिना सहकार नहि उद्धार" हे तत्त्व चांगलं पटलं, नव्हे तसंच घडलं आणि प्रकाशन प्रिंटला चढलं.

आजच्या जमान्याला ३ मिनिटि गाणीं ऐकून घेण्याची संवय जडल्यामुळें आतां शिवछत्रपतींच्या चारित्र्यावरील संपूर्ण पोवाडा लोक कसें ऐकून घेणार ? ही भली मोठी अडचण पहिल्यांदा मला खटकली, खूप वाचन करून शिवचरित्रांतील मुख्य प्रसंगाचे भले मोठे टांचण केलें. किती चौकाचा पोवाडा लिहावा ? असा विचार डोक्यांत आला पण म्हटलं हे चौक प्रकरण पुढें न मांडतां धांवत्या चाली घेऊन संपूर्ण चरित्राचा आढावा थोडक्यांत घ्यावा आणि शिवछत्रपतींच्याबद्दल आपणास वाटत असलेली आस्था काव्यांतून प्रगट करावी म्हणूनच हा पोवाडा मी लिहिला आहे.

या पोवाड्यामध्यें विश्वकवी गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या 'शिवाजी उत्सव' या काव्याच्या अनुरोधानें एक चौकमध्येंच गोंवला आहे, शिवछत्रपतींच्याबद्दल महार्षिनां काय वाटत होतं. ते, तो भाग वाचल्यानंतर स्पष्ट कळून येईल. हे संशोधन मला कसं शक्य झालं तर परमपूज्य गुरुवर्य विचारे यांच्या सहवासांत, फार काळ रहाण्याचा लाभ मला मिळाला आहे. आज त्यांच्या पुण्याईमुळेंच समाजाची थोडीबहूत सेवा मी माझ्या कुवतीप्रमाणें करीत आहे, संशोधन करण्याची मूळ शिकवण त्यांनीं मला दिली म्हणून हे पुष्प त्यांच्या पुण्य स्मृतीस मी वाहील आहे,

प्रस्तावना माझे परम स्नेही, जिवलग सहकारी माननीय जे. बी. लाहीगुडे यांनीं लिहिली आहे. प्रस्तावना मागतांच त्यांनीं अनेक कामें बाजूस सारून हे काम इतक्या आपुलकीनें केलें कीं, त्यांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानू ?

सदरचें प्रकाशन होत असतां चित्रकार रघुनाथ विठ्ठलराव चिपळूणकर आदि ज्यांनीं ज्यांनीं मला सहाह्य केले त्यांना व चित्रा आर्ट प्रिंटिंगचे चालक ना. बा. चौगुले यांना धन्यवाद देऊन माझें मनोगत पुरें करितों.

पुं. श्री. फरांदे,
ता. १७।४।१९५८.
मुंबई नं. २.

(लोकरंजनातून लोकशिक्षण या ध्येयावर आधारलेली)

शाहीर :— पुंडलिक फरांदे यांची

—आगामी प्रकाशनें—

ढोलगी तुणतुण्यावरील ढंगदार सामजिक लोकनाट्य. [ वग ]

१ अवघे धरु सुपंथ

२ गांव राज्य

अत्यंत विनोदी सामाजिक बोधप्रद नाटिका.

३ सासुरवास

४ कोंबडीवरुन भांडण

५ लोकगीताचा संग्रह आणि इतर

---

प्रकाशक :— जे. एस. फरांदे, C/o. चंपकलाल कंपनी, एम. जे. मार्केट, बाकडा नं. १४. मुंबई २.

मुद्रक : न्यू चित्रा आर्ट प्रिंटरी, कोळीवाडो, फणसवाडी, मुंबई नं. २.